नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २३९। किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




मंगळवार दि. ११ ऑगस्ट २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## महाराष्ट्राला जागतिक क्षमता केंद्रांसाठी देशातील सर्वाधिक पसंतीचे ठिकाण बनविण्याचा निर्धार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### राज्यात ४०० नवीन जागतिक क्षमता केंद्रे, ४ लाख उच्च कौशल्याधारित रोजगार आणि ५० हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे उद्दिष्ट

पुणे (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्राला जागतिक क्षमता केंद्रांसाठी (जिसीसी) भारतातील आघाडीचे आणि सर्वाधिक पसंतीचे ठिकाण बनविण्याचा राज्य शासनाचा निर्धार असून, राज्यात ४०० नवीन जागतिक क्षमता केंद्रे, ४ लाख उच्च कौशल्याधारित रोजगाराच्या संधी आणि ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

हॉटेल कॉनराड येथे आयोजित जीसीसीप्रोज नेतृत्व शिखर परिषदेत मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक व धोरण सल्लागार कौस्तुभ धवसे, जीसीसीप्रोजचे मुख्य सल्लागार निलेश देशमुख, शम्मी प्रभाकर, वरिष्ठ अधिकारी तसेच विविध जागतिक क्षमता केंद्रांचे प्रमुख, उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, भारतातील जागतिक क्षमता केंद्रांच्या वाटचालीची सुरुवात कुशल मनुष्यबळ, कौशल्य आणि खर्चाच्यादृष्टीने कार्यक्षमतेच्या आधारे झाली. मात्र, आता या क्षेत्राचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलत आहे. सन २०३० मधील जागतिक क्षमता केंद्रे केवळ कार्यालयीन सहाय्यक कामकाजापुरती मर्यादित राहणार नाहीत. ती अभियांत्रिकी, कृत्रिम बुद्धिमत्ता, उत्पादन विकास, सायबर सुरक्षा, वित्तीय सेवा, माहिती विश्लेषण




तसेच संशोधन व विकासाची केंद्रे बनतील. या केंद्रांमधून जागतिक व्यवसायांचे महत्त्वपूर्ण निर्णयही घेतले जातील.

महाराष्ट्राकडे जिसीसीसाठी सर्वसमावेशक परिसंस्था

महाराष्ट्राला जागतिक क्षमता केंद्रांच्या क्षेत्रात मोठी आघाडी मिळवून देणारे वैशिष्ट्य म्हणजे या केंद्रांसाठी आवश्यक असलेली सर्वसमावेशक परिसंस्था राज्यात आधीपासूनच उपलब्ध आहे. मुंबईकडे देशातील सखोल वित्तीय व व्यावसायिक परिसंस्था आहे. पुण्याकडे अभियांत्रिकी, वाहन उद्योग, उत्पादन क्षेत्र, तंत्रज्ञान आणि गुणवत्तापूर्ण मनुष्यबळाचा मजबूत आधार आहे.

नाशिक, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर यांसारख्या शहरांमध्येही जागतिक क्षमतेची विशेषीकृत केंद्रे विकसित करण्याची क्षमता आहे. त्यामुळे महाराष्ट्रात केवळ एका शहरात गुंतवणूक करण्याची संधी नसून, विविध शहरांमध्ये उपलब्ध असलेल्या प्रतिभा, कौशल्य आणि औद्योगिक क्षमतांचा एकत्रित लाभ घेण्याची संधी आहे. महाराष्ट्रात केवळ एक चांगले शहर नाही, तर शहरांचे, प्रतिभेचे आणि क्षमतांचे संपूर्ण जाळे उपलब्ध आहे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

पुण्याने सन २०२५ मध्ये जागतिक क्षमता केंद्रांच्या क्षेत्रातील आपली योग्यता सिद्ध केली आहे. सन २०२५ मध्ये पुणे भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे जागतिक क्षमता केंद्राची कार्यालयीन बाजारपेठ बनले असून, मागील वर्षाच्या तुलनेत या केंद्रांच्या संख्येत दुपटीहून अधिक वाढ झाली आहे. सन २०२६ च्या अखेरीस जागतिक क्षमता केंद्रांच्या क्षेत्रात पुणे देशाचे नेतृत्व करेल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

केवळ अनुदान नव्हे, सक्षम परिसंस्था निर्माण करण्यावर भर

केवळ अधिक चांगली आर्थिक सवलत देऊन महाराष्ट्राने जागतिक क्षमता केंद्रे आकर्षित करावीत, अशी शासनाची भूमिका नाही. अनुदानामुळे गुंतवणूक आकर्षित होऊ शकते; मात्र दीर्घकाळ टिकणारी परिसंस्था प्रतिभावान मनुष्यबळ, पायाभूत सुविधा, व्यवसाय सुलभता, जीवनमान, संशोधन, विद्यापीठे, दळणवळण सुविधा आणि शासन व उद्योग यांच्यातील विश्वासावर उभी राहते, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## इयत्ता ११ वी प्रवेशासाठी अंतिम विशेष फेरीची प्रक्रिया १२ ऑगस्टपासून

मुंबई (समर्थ गांवकरी)

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू असून आतापर्यंत १५ लाख ४५ हजार ६४० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी १३ लाख २६ हजार ३९७ विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश निश्चित केला आहे. अद्याप प्रवेश निश्चित न केलेल्या विद्यार्थ्यांसाठी १२ ऑगस्टपासून अंतिम विशेष फेरीचे आयोजन करण्यात आले असल्याचे शिक्षण संचालनालयामार्फत कळविण्यात आले आहे.

या विशेष फेरीमध्ये विद्यार्थ्यांना किमान १० कनिष्ठ महाविद्यालयांची पसंती नोंदविणे बंधनकारक असून प्रवेश अर्जाचा भाग-१ आणि भाग-२ लॉक करणे आवश्यक राहणार आहे. तसेच १२ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजेपासून १६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत नवीन नोंदणी, अर्ज भरणे तसेच पसंतीक्रम निश्चित करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.

वेळापत्रकानुसार १७ ऑगस्ट रोजी प्रवेशाची अंतरिम यादी जाहीर करण्यात येणार असून १८ ऑगस्ट रोजी वाटप यादी प्रसिद्ध होईल. वाटप झालेल्या विद्यार्थ्यांनी १८ ऑगस्ट सकाळी ११ वाजल्यापासून २० ऑगस्ट सायंकाळी ६ वाजेपर्यंत संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश निश्चित करावा. कोटा प्रवेश प्रक्रियेसाठीही स्वतंत्र कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

विद्यार्थी, पालक तसेच कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी अंतिम विशेष फेरीच्या वेळापत्रकाची नोंद घेऊन सर्व कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण करावी, असे आवाहन शिक्षण संचालनालयाच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी अधिकृत पोर्टल ाहरषूक्षलरवाळीळेपी.ळप ला भेट द्यावी किंवा हेल्पलाईन क्रमांक ८५३०९५५५६४ वर संपर्क साधावा, असे आवाहन शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) डॉ. महेश पालकर यांनी केले आहे.

## अन्नात भेसळ दिसताच थेट मोक्का, एकनाथ शिंदेंचा थेट आदेश

### या चुका झाल्यास सुटका नाही

(समर्थ गांवकरी)

गेल्या काही काळापासून राज्यातील अन्न आणि औषध प्रशासन विभागाकडून भेसळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणात येत आहे. तुकाराम मुंढे यांची ऋऊ च्या आयुक्त पदाची सुत्रे स्वीकारल्यापासून आस्थापनांवर कारवाई कडक कारवाई केली जात आहे. अशातच आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ऋऊ च्या अधिकाऱ्यांना भेसळ करणाऱ्यांविरोधात मोक्का अंतर्गत कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. एकनाथ शिंदे यांनी नेमकं काय म्हटलं ते सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

भेसळखोरांवर संघटित गुन्हेगारी अंतर्गत कारवाई

समोर आलेल्या माहितीनुसार, दूध पनीरसह अन्न भेसळखोरांवर संघटित गुन्हेगारी अंतर्गत कारवाई करावी अशा सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ऋऊ च्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. नागरिकांच्या आरोग्याशी आणि विशेषतः लहान मुलांच्या जीवाशी खेळणाऱ्या दूध, दुग्धजन्य पदार्थ भेसळखोरांवर संघटित गुन्हेगारी अंतर्गत गुन्हा दाखल करा असं एकनाथ शिंदे यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सादरीकरणादरम्यान दिल्या आहेत. त्यामुळे आता भेसळ करणाऱ्यांच्या अडचणीत वाढ होणार आहे.

काही काळापूर्वी राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये भेसळयुक्त दुधाचे रॅकेट पकडण्यात आले होते. या कारवाईत मोठ्या प्रमाणात दुधाचा साठा जप्त करण्यात आला होता. तसेच अनेकांना अटकही करण्यात आली आहे. अशातच आता यापुढे भेसळ करणाऱ्यांवर मोक्का अंतर्ग कठोर कारवाई केली जाणार आहे. एकनाथ शिंदेंच्या या सूचनेमुळे भेसळ करणाऱ्यांची चिंता वाढली आहे.

मोक्का काय आहे?

मोक्का म्हणजे म्हणजे महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी



नियंत्रण अधिनियम, १९९९. हा कायदा खंडणी, हत्या, अंमली पदार्थांची तस्करी, बनावट वस्तूंचे रॅकेट, भेसळ, आर्थिक फसवणूक अशा संघटित टोळ्या किंवा गुन्हेगारी सिंडिकेट्स यांच्यावर कारवाई करण्यासाठी तयार करण्यात आला आहे. याअंतर्ग गुन्हा सिद्ध झाल्यास किमान ५ वर्षे तुरुंगवास ते जन्मठेप अशी शिक्षा होते.

म्हत्त्वाची बाब म्हणजे एखाद्या व्यक्तीवर मोक्का अंतर्गत गुन्हा दाखल झाल्यास त्याला अटकपूर्व जामीन मिळत नाही. त्यामुळे या प्रकरणातील आरोपीला थेट अटक केली जाते.

## सुलवाडे-जामफळ-कनोली प्रकल्पातील अनुदानापासून वंचित प्रकल्पबाधित आदिवासींना अनुदान देणार : मंत्री गिरीश महाजन

### धुळे जिल्ह्यातील विविध सिंचन प्रकल्पांच्या कामांचा आढावा

मुंबई (समर्थ गांवकरी)

- पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांची प्रमुख उपस्थिती
- तापी-बोराई प्रकल्पाला नाबार्डच्या योजनेतून गती देणार

सुलवाडे-जामफळ-कनोली सिंचन प्रकल्पातील १५८ बाधितांना सानुग्रह अनुदान अदा करण्यात आले असून, उर्वरित ६० बाधितांना अद्याप अनुदान मिळालेले नाही. प्रकल्पातील अनुदान पासून वंचित प्रकल्पबाधित आदिवासींना अनुदान देण्यात येईल, अशी माहिती जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

तापी खोरे पाटबंधारे महामंडळांतर्गत धुळे जिल्ह्यातील विविध प्रकल्पांच्या कामांचा आढावा जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. यावेळी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, जलसंपदा लाभक्षेत्र विकास विभागाचे सचिव प्र. बा. मिसाळ, पाटबंधारे महामंडळाचे कार्यकारी संचालक जयंत बोरकर तसेच जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सुलवाडे-जामफळ प्रकल्पातून सिंचन क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने सुरू असलेल्या कामांमुळे मालपूर गावातील सिंचन क्षमतेत वाढ झाली आहे. मात्र, प्रकल्पाच्या परिसरातील इतर गावांमध्ये अपेक्षित सिंचन क्षमता वाढविण्याचे काम अद्याप पूर्ण होणे बाकी आहे. ही कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. तसेच सुलवाडे-जामफळ प्रकल्पातील १३२ केव्ही उपकेंद्राचे काम पूर्ण करून ते लवकरात लवकर कार्यान्वित करण्यात येईल, असेही मंत्री महाजन यांनी सांगितले.

तापी-बोराई प्रकल्पाला नाबार्डच्या योजनेतून गती देणार - पणनमंत्री जयकुमार रावल : राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी धुळे जिल्ह्यातील वाडी-शेवाडी प्रकल्प, प्रकाशा-बुराई उपसा सिंचन योजना यासह विविध प्रकल्पांना गती देण्याची गरज व्यक्त केली. अक्कलपाडा सिंचन प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झाले असून, प्रकल्पात पाणीसाठा सुरू केल्यानंतर बुडीत क्षेत्रात जाणाऱ्या जमिनींचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशा सूचना मंत्री रावल यांनी दिल्या.

## शिष्यवृत्ती परीक्षेत निळवंडे शाळेचे सहा विद्यार्थी गुणवत्ता यादीत

संगमनेर (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता चौथी) व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता सातवी) यांचा अंतिम निकाल व गुणवत्ता याद्या जाहीर झाल्या असून, निळवंडे जिल्हा परिषद शाळेने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेचे तब्बल सहा विद्यार्थी गुणवत्ता यादीत, तर एकूण २२ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले आहेत.

प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत पूनम गणेश आहेर (२५० गुण), अक्षरा शाम पवार (२४६), यश नानासाहेब पवार (२४४) आणि गौरी रावसाहेब पवार (२४२) यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. या परीक्षेत शाळेचे एकूण १६ विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत अनुज तुषार फल्ले (२५० गुण) आणि गायत्री रामनाथ केरे (२२६) यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवले असून, या परीक्षेत एकूण सहा विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र विद्यार्थ्यांमध्ये स्वरा सुधीर पवार (२२६), स्वरा राजेंद्र पाचारणे (२२६), काव्या सतीश पवार (२१४), जीवन रोहिदास आहेर (२१४), साईश्वरी सोमनाथ आहेर (२०६), कृष्णा प्रकाश पवार (२०४), श्रेयश दत्तात्रय केरे (१९८), रुद्र सचिन सोनवणे (१७८), अनन्या विलास पवार (१७८), अनुष्का सुदाम उकिरडे (१४०), कैवल्य राजेंद्र केरे (१३८) आणि सानिका संदीप पवार (१२६) यांचा समावेश आहे.

उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत सोहम बाळासाहेब पवार (२२०), प्रिया सतीश भोसले (१६२), आराध्या मुक्ताहरी दवंगे (१६०) आणि पूर्वा दत्तात्रय केरे (१४२) हे विद्यार्थी पात्र ठरले आहेत.




मुख्याध्यापक रमेश निघुते यांच्या मार्गदर्शनाखाली शिष्यवृत्ती परीक्षेचे तज्ज्ञ मार्गदर्शक अनिल कडलग, वर्गशिक्षिका मंदा कडलग-गायकर, इयत्ता सातवीचे वर्गशिक्षक तुषार फल्ले व संजय एरंडे यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांना हे यश मिळाले.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी अनिल कडलग यांनी प्रत्येक रविवार तसेच सुट्टीच्या दिवशी अतिरिक्त तास घेऊन मार्गदर्शन केले. अनिल कडलग व तुषार फल्ले यांनी प्रत्येक विषयाच्या १५० पेक्षा अधिक प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांकडून सोडवून घेतल्या. चुकलेल्या प्रश्नांचे पुन्हा-पुन्हा विश्लेषण करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

शिक्षकांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश संपादन केले.

या यशाबद्दल संगमनेर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड, शिक्षण विस्तार अधिकारी कैलास भागवत, केंद्रप्रमुख आशा घुले, निळवंडे गावच्या सरपंच शशिकलाताई पवार, उपसरपंच भाऊसाहेब आहेर, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष शिवाजी आहेर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय आहेर, उपाध्यक्ष उत्तम पवार, सदस्य सोमनाथ आहेर, माजी अध्यक्ष रावसाहेब वारे, पोपटराव पवार, तसेच शाळेतील शिक्षक कैलास दिघे, अनिल गाडेकर, सौदामिनी सोनवणे आदींनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया

शाळेतील शिष्यवृत्तीचे तज्ज्ञ मार्गदर्शक अनिल कडलग, मंदा कडलग व तुषार फल्ले सरांनी शाळेच्या वेळेव्यतिरिक्त जादा तास घेऊन आम्हाला मार्गदर्शन केले. आमच्या प्रत्येक अडचणी समजून सांगितल्या. अनेक प्रश्नपत्रिका सोडवून घेतल्या तसेच चुकलेल्या प्रश्नांबाबत पुन्हा-पुन्हा मार्गदर्शन केले. त्यामुळे आम्हाला हे यश मिळवता आले.

**- कुमारी पूनम गणेश आहेर व अनुज तुषार फल्ले**

**(इयत्ता चौथी व सातवी - प्रत्येकी २५० गुण)**

### पालकांची प्रतिक्रिया

आमची निळवंडे जिल्हा परिषदेची शाळा जिल्ह्यात नावलौकिक मिळवलेली शाळा आहे. कला, क्रीडा याबरोबरच स्पर्धा परीक्षांमध्येही या शाळेचे नाव जिल्हास्तरावर आहे. शिक्षकांची अथक मेहनत, जिद्द, चिकाटी, अतिरिक्त वेळ देण्याची तयारी आणि त्याला विद्यार्थ्यांसह पालकांनी दिलेली मोलाची साथ यामुळे हे यश मिळाले आहे.

**- प्रकाश साहेबराव पवार**
**पालक व बागायतदार शेतकरी, निळवंडे**



# महिलांचा सन्मान, मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन आणि त्यांच्यातील नेतृत्वगुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा संस्थेच्या कार्याचा महत्त्वाचा भाग

## कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उच्चशिक्षित प्राध्यापिका व प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांची निवड ही संस्थेच्या प्रगतिशील विचारसरणीचे प्रतीक ठरली

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

या कार्यक्रमाच्या प्रारंभी पारंपरिक वेशभूषेत भव्य मिरवणूक काढण्यात आली. हातात विविध संदेशांचे बॅनर घेऊन समाजबांधव घोषणांच्या गजरात सहभागी झाले होते. आदिवासी समाजाचे दैवत, क्रांतिकारक आणि महापुरुषांच्या विचारांचा जागर तसेच 'शिका, संघटित व्हा आणि पुढे जा' असा संदेश देणारे फलक मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरले.

अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने निघालेल्या या मिरवणुकीत महिला, युवक, विद्यार्थी आणि ज्येष्ठ समाजबांधवांचा मोठा सहभाग होता.पारंपरिक वाद्ये, लोककला,पावरा नृत्य आणि पारंपरिक वेशभूषेमुळे मिरवणुकीत आदिवासी संस्कृतीचे वैभवपूर्ण दर्शन घडले.

कोहणे, ता. अकोले येथील राजा हरिश्चंद्र लेझीम पथकाने मिरवणुकीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. संस्थेच्या वतीने पथकाचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन, प्रतिमापूजन आणि वृक्षपूजन करून मुख्य कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

'समाजभूषण पुरस्कारातून कर्तृत्वाचा गौरव'

कार्यक्रमात समाजासाठी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना 'आदिवासी समाजभूषण पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. सहादु भांगरे, डॉ. विष्णू बुळे, अशोक धिंदळे, प्रा. डॉ. नितीन तळपाडे, लेफ्टनंट प्राध्यापक भरत डगळे, चिंधू भांगरे, दिगंबर नवाळी, साईनाथ वाळेकर आणि यशवंत झडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या पुरस्कारामागे केवळ सन्मानाचा हेतू नसून, समाजात विविध क्षेत्रांत चांगले काम करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या कार्यातून इतरांना प्रेरणा मिळावी, हा संस्थेचा व्यापक दृष्टिकोन असल्याचे यावेळी अधोरेखित झाले.

'गुणवंत विद्यार्थी आणि सेवानिवृत्तांचा गौरव'

कार्यक्रमात दिनकर भांगरे, मनोहर कोंडार, राम चंद्र सुपे, निवृत्ती गभाले आणि विठ्ठल म्हशाळ यांचा सेवानिवृत्ती निमित्त सहपत्नीक सन्मान करण्यात आला. आयुष्यभर विविध क्षेत्रांत सेवा बजावून समाज आणि प्रशासनासाठी योगदान दिलेल्या या व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

तसेच सिद्धी धिंदळे, अथर्व भांगरे,ज्योती भांगरे, अवंतिका सावळे, तेजस गोडे आणि आदिश्री बोकड यांचा विशेष सत्कार करून त्यांच्या गुणवत्तेला आणि कर्तृत्वाला प्रोत्साहन देण्यात आले.

'संस्थेच्या कार्याचे मान्यवरांकडून कौतुक'

प्रा.डॉ.नितीन तळपाडे यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांच्या संरक्षणासाठी शिक्षण आणि संघटन आवश्यक असल्याचे सांगितले.नव्या पिढीने उच्च शिक्षण घेऊन समाजाच्या विकासात सक्रिय योगदान द्यावे.असे आवाहन त्यांनी केले.

डॉ.पी.डी.गांडाळ यांनी आधुनिक विकासाच्या प्रवाहात सहभागी होताना आदिवासी समाजाने आपली संस्कृती,परंपरा आणि निसर्गाशी असलेले नाते कायम जपावे, असे सांगितले.

आदिवासी सामाजिक बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष जगन्नाथ सावळे यांच्या नेतृत्वाखाली संस्था सामाजिक,शैक्षणिक, सांस्कृतिक आणि संघटनात्मक क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहे.विद्यार्थ्यांना प्रोत्साहन, गुणवंतांचा सन्मान, महिलांचा गौरव,



सामाजिक जनजागृती, सांस्कृतिक संवर्धन आणि समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचे कार्य संस्था करीत आहे.

संस्थेच्या विविध सामाजिक उपक्रमांमध्ये प्रत्यक्ष सहभाग घेत समाजाच्या प्रश्नांवर काम करण्याच्या प्रयत्नांचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. संस्थेच्या कार्याला भविष्यात अधिक व्यापक स्वरूप मिळावे अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

' आयोजनासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे परिश्रम'

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष जगन्नाथ सावळे,उपाध्यक्ष हिरामण पोपेरे,सचिव कविराज बोटे, सहसचिव शिवानंद भांगरे यांच्यासह सुभाष भांगरे, दिनकर भांगरे,भरत साबळे, सोमनाथ शिंगाडे,प्रा.भाऊराव नाडेकर आणि तुकाराम बारामते यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भाऊराव नाडेकर आणि तुकाराम बारामते यांनी केले.

# खाजगी क्षेत्रात आरक्षण लागू करण्याचा संसदेने कायदा करावा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**देशव्यापी विस्तारासह राष्ट्रीय पक्षाचा दर्जा रिपब्लिकन पक्ष मिळवणार : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले**



नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

सरकारी क्षेत्रात जसे अनुसूचित जाती जमाती आणि ओबीसींना आरक्षण लागू आहे तसेच खाजगी क्षेत्रात ही आरक्षण लागू करण्याचा कायदा संसदेने करावा असा ठराव आज रिपब्लिकन पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणी च्या बैठकीत करण्यात आला. खाजगी क्षेत्रात आरक्षण लागू करण्याचा ठराव संसदेने करावा या मागणीसाठी रिपब्लिकन पक्षाचे शिष्टमंडळ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेणार असल्याची माहिती रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. नवी दिल्लीत नवीन महाराष्ट्र सदन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत ना. रामदास आठवले यांनी आज पत्रकारांशी संवाद साधला.

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री मा. रामदास आठवले यांनी सांगितले की, आगामी काही वर्षांत रिपब्लिकन पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळवून देणे हे पक्षाचे प्रमुख उद्दिष्ट आहे आणि यासाठी संघटनेचा देशव्यापी विस्तार व जनाधार वाढविण्यावर विशेष भर दिला जात आहे.

पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार न्यू महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे आयोजित रिपब्लिकन पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना ना.रामदास आठवले यांनी सांगितले की, नागालँडमध्ये दोन विधानसभा जागा जिंकणे तसेच मणिपूरमध्ये पक्षाची चांगली कामगिरी झाल्यानंतर दोन राज्यांमध्ये रिपब्लिकन पक्षाला राज्यस्तरीय पक्षाची मान्यता यापूर्वीच मिळाली आहे आणि सर्व २८ राज्ये तसेच ८ केंद्रशासित प्रदेशांमध्ये संघटना सक्रिय आहे.

राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत पक्षाच्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांनी आणि प्रमुख कार्यकर्त्यांनी संघटनेची सद्यस्थिती, आगामी कार्ययोजना आणि विविध राज्यांमध्ये पक्षाच्या विस्ताराबाबत सविस्तर चर्चा केली.

ना. रामदास आठवले यांनी सांगितले की, पक्ष लवकरच २ कोटी नवीन सदस्य जोडण्यासाठी देशव्यापी सदस्यत्व अभियान सुरू करणार आहे. याचा उद्देश केवळ सदस्यसंख्या वाढवणे नसून, प्रत्येक राज्य, जिल्हा, विधानसभा क्षेत्र आणि बूथ स्तरापर्यंत पक्षाची मजबूत आणि सक्रिय संघटनात्मक रचना तयार करणे हा आहे.

ना. रामदास आठवले यांनी सांगितले की, 'भारतरत्न' आणि संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हे रिपब्लिकन पक्षाच्या वैचारिक शक्तीचे आणि सामाजिक न्यायाच्या राजकारणाचे आधार आहेत.

पक्ष बाबासाहेबांच्या संविधान, समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या संदेशाचा देशातील प्रत्येक वर्गापर्यंत प्रसार करण्यासाठी सातत्याने कार्य करत आहे.

ना. रामदास आठवले यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना आवाहन केले की, त्यांनी जनतेच्या स्थानिक समस्यांना प्राधान्य द्यावे, सर्वसामान्य नागरिकांशी सातत्याने संवाद प्रस्थापित करावा आणि संघटनेला जनसेवेचे प्रभावी माध्यम बनवावे. ना.रामदास आठवले यांनी सांगितले की, रिपब्लिकन पक्षाला राष्ट्रीय स्तरावर एक सशक्त राजकीय पर्याय म्हणून प्रस्थापित करण्यात प्रत्येक कार्यकर्त्याची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

# निवडणुकीपुरते राजकारण हवे; गावहितासाठी पहिले प्राधान्य : आ. विवेकभैय्या कोल्हे

## धामोरी येथील श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्टच्या नव्या व्यावसायिक गाळ्यांचे उद्घाटन; ४० उद्योजकांना व्यवसायाची संधी

कोपरगाव (समर्थ गांवकरी)

निवडणुकीपुरते राजकारण हवे. निवडणूक झाल्यानंतर राजकीय जोडे बाजूला ठेवून गावहितासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन काम केले पाहिजे. गावहिताचा कुठलाही प्रश्न असेल, तर तो सोडविण्यासाठी आमदार या नात्याने पहिले पाऊल आम्ही उचलू, असे प्रतिपादन आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी जाहीरपणे केले.

कोपरगाव तालुक्यातील धामोरी येथील श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्टच्या नव्या व्यावसायिक गाळ्यांचे उद्घाटन १० ऑगस्ट रोजी प.पू. रमेशगिरीजी महाराज यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी आमदार विवेकभैय्या कोल्हे बोलत होते.

सध्या चोहीकडे बेरोजगारीचा प्रश्न भेडसावत असताना धामोरी येथे श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्टअंतर्गत बांधण्यात आलेल्या नव्या व्यावसायिक गाळ्यांच्या माध्यमातून ४० उद्योजकांना व्यवसायाची संधी उपलब्ध होणार आहे. या माध्यमातून ते उद्योग-व्यवसाय यशस्वीरित्या करू शकतील. श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्टची स्थापना १९५४ साली झाली असून, आजवर ट्रस्टच्या कामकाजावर कुठलेही शिंतोडे किंवा ताशेरे ओढले गेले नाहीत. ट्रस्टच्या माध्यमातून सातत्याने विकासकामे करण्यात आली आहेत. आजवर ३१ व्यावसायिक गाळ्यांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून, आता नव्याने आणखी १० गाळे उभारण्यात आले आहेत. त्यामुळे स्थानिक छोटे व्यापारी व उद्योजकांना उद्योग-व्यवसाय सुरू करण्याची नवी संधी उपलब्ध झाली आहे.

मध्यंतरी झालेल्या अतिवृष्टीमुळे धामोरी परिसरातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना विशेष बाब म्हणून मदत मिळावी, यासाठी मंत्रिमहोदयांकडे विनंती करण्यात आली असून त्याबाबत सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे आमदार कोल्हे यांनी सांगितले.श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्टची सुमारे सात एकर जागा शिल्लक असून, या ट्रस्टने तालुक्यातील इतर गावांसमोर आदर्श निर्माण केला आहे. आम्ही आणि आमचे कार्यकर्ते सतर्क राहून शासनाच्या सर्व योजना युवक व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पुढील काळात अधिक



प्रभावीपणे काम करू, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना राज्यकर्ते व कार्यकर्ते म्हणून सर्वसामान्य उद्योजकांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आपली आहे. जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून उद्योग-व्यवसायासाठी विविध योजना उपलब्ध होत असतात. त्या योजनांचा जास्तीत जास्त लाभ उद्योजकांनी घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

# आदिवासी तरुण हा तीन त करांनी युक्त असावा : रविंद्र भोर

## मांडवी नदी उगम खोरे समाजबांधव कोपरे येथे आदिवासी संस्कृतीचा जागर; जागतिक आदिवासी दिन व क्रांतीदिन उत्साहात साजरा

जुन्नर (समर्थ गांवकरी)

जागतिक आदिवासी दिन साजरा करताना आजचा आदिवासी तरुण आणित्यांची जबाबदारी याविषयावर रास्त मार्गदर्शन करताना प्रमुख वक्ते जेष्ठ पत्रकार व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष रविंद्र भोर यांनी सांगितले की तरुण कोणाला म्हणावे ज्याच्या अंगी तीन त

कार संबधी गुणधर्म असेल म्हणजे पहिला तम्हणजे तेजस्विता,दुसरा त म्हणजे तपस्वीता आणि तिसरा त म्हणजे तत्परता असेल तरच तो तरुण समजावा हल्ली तरुण पूर्णपणे मोबाईल च्या आहारी गेली असून मद्यपान करण्यात देखी आघाडीवर आहे.यावेळी व्यासपीठावर ठाणे तहसीलदार प्रदीप कुडळ,जिल्हा परिषद सदस्या सोनाबाई दाभाडे,माजी जिल्हा परिषद सदस्य अंकुश आमले, काशिनाथ माळवे, अशोक ठोगिरे,पी.एस.कवटे, चंद्रकांत लोहोकरे,सखाराम पिचड,सरपंच रोहिणी माळी, फसाबई कवटे,माजी सरपंच हौसाबाई काठे,भिमराव मुठे,

ठमाजी कवटे,सुनिल मुठे, कैलास सुपे,संदीप शिंगोटे,उप

सरपंच कुडळ,राजेंद्र दाभाडे आशावर्कर, विद्यार्थी,ग्रामस्थ खासकरून तरुण पिढीमोठ्या संख्येने उपस्थित होते.

मांडवी नदी उगम खोरे समाजबांधव कोपरे ता:-जुन्नर



येथे ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिन निमित्ताने विविध शैक्षणिक सांस्कृतिक प्रबोधनात्मक उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.आदिवासी समाजाचा समृद्ध सांस्कृतिक वारसा,परंपरा,लोकजीवन, स्वातंत्र्यलढ्यातील योगदान तसेच पर्यावरण संवर्धनातील त्यांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेची विद्यार्थ्यांना जाणीव करून देण्याच्या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात

मुथाळणे येथील वाघोबाच्या प्रतिमेसह छत्रपती शिवाजी महाराज,छत्रपती शाहू महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,महात्मा ज्योतीबा व सावित्री बाई फुले आणि आदिवासी समाजातील महान व्यक्तींच्या राघोबा भांगरे, बिरसा मुंढा यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली येथूनच मोटार सायकल व चारचाकी वाहना तून ९ किलोमीटर रॅली काढून

मुथाळणे व पुताचीवाडी येथील मंदिरात श्रीफळ व पूजन करून शेवटी कोपरे या दुर्गम गावात पोहचली.

येथे सभेचे आयोजन करण्यात आले यावेळी कार्य क्रमात जि.प.प्राथ.शाळेतील विद्यार्थ्यांनी आदिवासी संस्कृतीवर आधारित नृत्य गीतगायन,विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी आदिवासी समाजाचा इतिहास, संस्कृती, परंपरा व निसर्गाशी असलेले अतूट नाते याविषयी प्रभावी पणे मनोगते व्यक्त केली. यावेळी आदिवासी समाज व संस्कृतीचे अभ्यासक धर्मा दिघे यांनी आदिवासी संस्कृती कशी महान अतिप्राचीन आहे हे समजावून सांगितले आणि उपस्थित आबालवृद्ध यांना

निसर्गाचे रक्षण करूया, आदिवासी समाजाचा सन्मान करूया,समानतेचा संदेश देऊया,अशी प्रेरणादायी प्रतिज्ञा करून घेतली. संपूर्ण कार्यक्रमाचे प्रस्ताविक मांडवी नदी उगम खोरे समाजबांधव चे संस्थापक पुनाजी मुठे यांनी सूत्रसंचालन शंकर माळी यांनी

तर आभार तुकाराम हगवणे मानले कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी सर्व कोपरे मांडवे, मुथाळणे या दुर्गम आदिवासी भागातील मांडवी नदी उगम खोरे समाजबांधव सर्व कार्यकर्ते व खासकरून आदिवासी तरुणांनी प्रचंड मेहनत घेतली.

# नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशन, महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन व पारनेर तालुका पतसंस्था फेडरेशनचा उपक्रम

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

पतसंस्थांची चळवळ ही ग्रामीण भागातील आहे. गरजू लोकांना मदत करण्याचे काम पतसंस्थांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात होत आहे. दुष्काळी तालुका असून देखील नोकरी,धंदा व व्यवसाय करण्याच्या उद्देशाने बाहेर पडलेले पारनेर येथील रहिवासी पतसंस्थांना बचतीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात ठेवी देऊन बळ देण्याचे काम करत असतात.

साखर कारखान्यांना अडचण आल्यास राज्य सरकारकडून मदत दिली जाते.परंतु एखादी पतसंस्था अडचणीत आली तर सहकार खात्याकडून कोणत्याही प्रकारचे संरक्षण दिले जात नाही.ही मोठी खंत आहे.

पतसंस्थांच्या माध्यमातून सहकार खात्याला वेगवेगळ्या प्रकारचा महसूल जमा केला जातो. पतसंस्थांना राज्य सरकारकडून संरक्षण मिळणे गरजेचे आहे. पतसंस्थांच्या ठेवींना राज्य सरकारकडून संरक्षण मिळाल्यास पतसंस्थांवरील विश्वास वाढेल व पतसंस्था चळवळीला मोठे बळ मिळेल.असे प्रतिपादन पारनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी केले आहे.

**■ पारनेर तालुक्यातील पतसंस्थांचे एक दिवशीय प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न**

**■ पतसंस्थांच्या ठेवींना राज्य सरकारकडून संरक्षण मिळाल्यास पतसंस्थांवरील विश्वास वाढेल व पतसंस्था चळवळीला मोठे बळ मिळेल-आमदार काशिनाथ दाते**

नाशिक विभागीय नागरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था फेडरेशन आयोजित

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन,पारनेर तालुका पतसंस्था फेडरेशन जिल्हा उपनिबंधक कार्यालय सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने पारनेर तालुक्यातील पतसंस्थांच्या एकदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन पारनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले.

याप्रसंगी विशाल दाते (सहाय्यक निबंधक,सहकारी संख्या ता.पारनेर),प्रमुख मार्गदर्शकःमहाराष्ट्र टाज्य



सहकारी पतसंस्था फेडरेशनचे कार्यकारी अध्यक्ष काकासाहेव कोयटे,माजी सहनिबंधक तानाजी कवडे,महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे संचालक भास्कर बांगर,नाशिक विभागीय नागरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा,नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशनचे कार्याध्यक्ष वसंतराव कवाद, व्यवस्थापक महेश जाधव,पारनेर तालुका पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष शिवाजी मोरे, पुणे जिल्हा महात्मा फुले ग्रामीण पतसंस्थेचे सोपान भाकरे, निघोज ग्रामीण पतसंस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव थोरात,मराठा पतसंस्थेचे उपाध्यक्ष उदय अनभुले आदी उपस्थित होते.

आमदार काशिनाथ दाते पुढे म्हणाले, पतसंस्थांच्या प्रशिक्षण कार्यशाळेच्या माध्यमातून पतसंस्थांचे व्यवस्थापन सुधारण्यास मदत होईल. पतसंस्था चळवळीत काही अपप्रवृत्तीने राजकारण आणण्याचा प्रयत्न केला आहे त्याचा फटका अनेक पतसंस्थांना बसला आहे.

पतसंस्था चळवळीत काहीही संबंध नसणाऱ्या लोकांनी पतसंस्था बुडीत कसे निघतील. अशा पद्धतीची भूमिका काही नेतृत्व घेत आहेत.ही गोष्ट निषेध करण्यासारखी आहे.सहकार हा राजकारणाचा अड्डा नाही. पतसंस्था बंद पडल्याने संस्थापक व संस्थाचालक राजकारणात विरोध करणार नाही.या विचाराने काही प्रवृत्ती तालुक्यात काम करीत आहेत. राजकारण करीत असताना सहकार क्षेत्रात कधीही राजकारण केले नाही. सहकार क्षेत्रात पतसंस्था चळवळीला बळ मिळण्यासाठी पारनेर तालुक्यात भूमिका घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

काकासाहेब कोयटे म्हणाले, अहिल्या नगर जिल्हा हा सहकाराची पंढरी असलेला जिल्हा आहे.पारनेर तालुक्यातील पतसंस्था चांगल्या पद्धतीने काम करीत असल्याने मोठ्या प्रमाणात ठेवी आहेत.पतसंस्थांना चांगले व्यवस्थापन करण्यासाठी व सहकाराची माहिती होण्यासाठी प्रशिक्षण कार्यशाळेची गरज आहे.

तालुक्याच्या ठिकाणी प्रशिक्षण कार्यशाळा घेतल्या ने पतसंस्थांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला आहे.आमदार काशीनाथ दाते यांच्या मार्गदर्शनामुळे पतसंस्था चळवळीला मोठे बळ मिळेल. सहकार चळवळीत काशिनाथ दाते यांचे पूर्वीपासूनच योगदान लाभत आहे.

वसंत लोढा म्हणाले, पारनेर तालुका हा नगर जिल्ह्यातील सर्वात श्रीमंत तालुका समजला जातो.

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## गणेश झंवर आणि प्रशांतदादा थोरवे यांची समर्थ सत्संग परिवारच्या विश्वस्त पदी निवड



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) :** समर्थ सत्संग परिवार या नोंदणीकृत संस्थेच्या कार्यकारी मंडळाची बैठक दि. ९/८/२०२६ रोजी मंडळाचे सदस्य वैद्य अनिकेत घोटणकर यांच्या निवासस्थानी संपन्न झाली. अतिशय स्नेहादराच्या वातावरणात झालेल्या या बैठकीत सर्व सदस्यांची पुढील कार्यकाळासाठी पुनर्निवड करण्यात आली.

या कार्यकारिणीत सुप्रसिद्ध उद्योजक गणेश झंवर आणि सुप्रसिद्ध विधिज्ञ प्रशांतदादा थोरवे या दोन नवीन सदस्यांना एकमताने नियुक्ती देण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष मंदारबुवा रामदासी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीत आगामी काळात घेण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रम ांविषयी विस्ताराने चर्चा करण्यात आली.

आगामी काळात समर्थ सत्संग परिवाराच्या माध्यमातून जास्तीत जास्त समाजोपयोगी, राष्ट्रहितकारक उपक्रम घेण्यात यावेत असे सर्वानुमते ठरले.मागील कार्यकाळात झालेल्या उपक्रमांपैकी रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, महिलांना शिलाई मशीन देणे, विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करणे इ.सामाजिक उपक्रमांची याही कार्यकाळात पुनरावृत्ती करावी असे ठरले.तसेच दादेगाव येथे होणाऱ्या प्रतिवार्षिक उत्सवासाठी सहभागी होणाऱ्या भाविकांसाठी भव्य भक्तनिवास बांधकाम करण्याचा ठराव घेण्यात आला.

## मनपा कर्मचारी धीरज परदेशी मृत्यू प्रकरण

### मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर पार्थिवावर अंत्यसंस्कार



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) :** म हापालिकेच्या विद्युत विभागातील कंत्राटी कर्मचारी धीरज कचरूसिंग राजपूत- परदेशी यांच्या निर्घृण हत्येने संतप्त झालेल्या नागरिकांचा आक्रोश सोमवारी रात्री रस्त्यावर पाहायला मिळाला. आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, हत्येच्या कटातील सर्व आरोपींना अटक करावी आणि आरोपींची अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे जमीनदोस्त करावीत, या मागण्यांसाठी डीएसपी चौकात सुरू करण्यात आलेले रास्तारोको आंदोलन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आश्वासनानंतर मागे घेण्यात आले. त्यानंतर धीरज परदेशी यांचे पार्थिव अंत्यसंस्कारासाठी नेण्यात आले.

धीरज परदेशी यांच्यावर मुकुंदनगर परिसरातील दर्गा दायरा येथे पथदिव्यांच्या दुरुस्तीचे काम करत असताना हल्ला करण्यात आला होता. गंभीर जखमी अवस्थेत त्यांच्यावर उपचार सुरू असताना रविवारी त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर त्यांच्या पार्थिवाचे छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले.

## कोपरगाव नगरपरिषदेला नवीन ६५ सीट्सच्या मुतारी सुविधा उपलब्ध होणार : पराग संधान

**कोपरगाव (समर्थ गांवकरी):** शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्याबरोबरच नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी स्वच्छ व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कोपरगाव नगरपरिषदेला महत्त्वपूर्ण मान्यता मिळाली आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत कोपरगाव नगरपरिषदेच्या नवीन ६५ सीट्सच्या मुतारी उभारणीच्या आराखड्यास शासनाची मान्यता मिळाली असून, त्यासाठी एकूण ४० लाख ४९ हजार रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे, अशी माहिती नगराध्यक्ष पराग संधान यांनी दिली.



या मंजूर आराखड्यानुसार शहरात यापूर्वी १५० सीट्सचे शौचालय मंजूर आहेत.आता ६५ सीट्सची मुतारी सुविधा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नागरिकांना बाजारपेठ, गर्दीची ठिकाणे आणि सार्वजनिक वापराच्या परिसरात स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.आ. विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक काळात नागरिकांना विश्वासनामाच्या माध्यमातून दिलेल्या शब्दाच्या पूर्ततेकडे नगराध्यक्ष पराग संधान यांनी टाकलेले हे पाऊल अतिशय महत्त्वाचे ठरणार आहे.

# महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या संवर्धनासाठी केंद्राचा विशेष निधी द्या

## जागतिक वारसा किल्ल्यांसाठी स्वतंत्र संवर्धन व पुनरुज्जीवन पॅकेज जाहीर करण्याची खासदार नीलेश लंके यांची पंतप्रधानांकडे मागणी

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाची साक्ष देणाऱ्या ऐतिहासिक किल्ल्यांचे संरक्षण, संवर्धन आणि पुनरुज्जीवन करण्यासाठी केंद्र सरकारने विशेष निधी उपलब्ध करून द्यावा. तसेच 'मराठा लष्करी भूदृश्य' या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झालेल्या महाराष्ट्रातील किल्ल्यांसाठी स्वतंत्र संवर्धन व पुनरुज्जीवन पॅकेज जाहीर करावे, अशी मागणी खासदार निलेश ज्ञानदेव लंके यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे.

'मराठा लष्करी भूदृश्य' या ऐतिहासिक वारशाचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाल्याच्या पार्श्वभूमीवर खासदार लंके यांनी पंतप्रधानांना निवेदन देत महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या संवर्धनाचा मुद्दा गांभीर्याने मांडला आहे. महाराष्ट्रातील किल्ले हे केवळ पर्यटनस्थळे नसून छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा साम्राज्याच्या पराक्रमाची, दूरदृष्टीची आणि स्थापत्यकौशल्याची जिवंत साक्ष देणारा अमूल्य वारसा आहे. त्यामुळे या ऐतिहासिक ठेव्याचे जतन करणे ही शासनाची महत्त्वाची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

महाराष्ट्रातील अनेक किल्ल्यांकडे नियमित देखभाल व पुरेशा निधीअभावी दुर्लक्ष होत असून काही किल्ल्यांची तटबंदी, बुरुज, प्रवेशद्वारे, पाण्याच्या टाक्या आणि अन्य ऐतिहासिक वास्तू जीर्ण होत आहेत. काळाच्या ओघात या वास्तूंचे नुकसान वाढत असून वेळीच उपाययोजना न केल्यास ऐतिहासिक वारशाची अपरिमित हानी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे किल्ल्यांच्या संवर्धनासाठी केंद्र सरकारने स्वतंत्र आणि दीर्घकालीन आर्थिक तरतूद करावी, अशी मागणी लंके यांनी केली आहे.

किल्ल्यांची प्राचीन वास्तुरचना आणि ऐतिहासिक स्वरूप अबाधित ठेवून शास्त्रोक्त पद्धतीने संवर्धनाची कामे करणे आवश्यक आहे. तटबंदी, बुरुज, प्रवेशद्वारे, जलव्यवस्था, प्राचीन वास्तू तसेच किल्ल्यांवरील ऐतिहासिक अवशेषांचे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली जतन करण्यात यावे. संवर्धनाच्या कामांसाठी पुरातत्त्व, वास्तुशास्त्र आणि इतिहास क्षेत्रातील तज्ज्ञांचा सहभाग असलेली यंत्रणा उभारण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

किल्ल्यांच्या संवर्धनाबरोबरच पर्यटकांसाठी आवश्यक मूलभूत सुविधांचा विकास करण्याची म ागणीही खासदार लंके यांनी केली आहे. किल्ल्यांवर सुरक्षितता व्यवस्था, स्वच्छता, प्रकाश व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, दिशादर्शक फलक, माहिती केंद्रे, प्रशिक्षित मार्गदर्शक आणि सुरक्षित मार्ग यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. मात्र, या सुविधा उभारताना किल्ल्यांच्या ऐतिहासिक आणि नैसर्गिक स्वरूपाला कोणतीही बाधा येणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्रातील किल्ल्यांना जागतिक दर्जाच्या पर्यटनस्थळांचा दर्जा मिळवून दिल्यास राज्याच्या पर्यटन क्षेत्राला मोठी चालना मिळू शकते. देश-विदेशातील पर्यटक मोठ्या संख्येने किल्ल्यांना भेट देऊ शकतात. त्यातून स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण होऊन किल्ल्यांच्या परिसरातील गावांच्या अर्थव्यवस्थेलाही बळ मिळू शकते. त्यामुळे ऐतिहासिक वारशाचे जतन आणि पर्यटन विकास यांची सांगड घालणे आवश्यक आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत



महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वारशाचा समावेश होणे ही राज्यासाठी अभिमानाची बाब आहे. या पार्श्वभूम ीवर केंद्र सरकारने महाराष्ट्रातील ऐतिहासिक किल्ल्यांच्या संवर्धनासाठी विशेष निधी उपलब्ध करून द्यावा आणि जागतिक वारसा म्हणून मान्यता मिळालेल्या किल्ल्यांसाठी स्वतंत्र संवर्धन व पुनरुज्जीवन पॅकेज जाहीर करावे, अशी ठोस मागणी खासदार नीलेश लंके यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे.

# शुक्लेश्वर मंदिराला मिळणार आता जागतिक दर्जा; वर्ल्ड हेरिटेज नामांकनासाठी हालचाली सुरू

**कोपरगाव(समर्थ गांवकरी)**

धार्मिक आणि पौराणिक महत्त्व लाभलेल्या कोपरगाव येथील श्री गुरू शुक्राचार्य महाराज मंदिराला जागतिक स्तरावर ओळख मिळण्याचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे. (एशियन कंट्रीज चेंबर ऑफ कॅीर्ळीरश्रळीू इंडस्ट्री) चे चेअरमन डॉ. अवसर मेल व डॉ. महेश चौधरी आणि त्यांच्या संपूर्ण टीमने काल दिनांक ७ ऑगस्ट रोजी दुपारी श्री गुरू शुक्राचार्य महाराज मंदिराला भेट दिली. यावेळी त्यांनी मंदिराच्या धार्मिक व पौराणिक महत्त्वामुळे वर्ल्ड हेरिटेजमध्ये नामांकनासाठी प्रयत्न केले जाणार असल्याची महत्त्वपूर्ण माहिती दिली.

मंदिराचा जागतिक वारसा स्थळामध्ये समावेश व्हावा, यासाठी आवश्यक प्रक्रिया आणि पुढील कार्यवाहीबाबत लवकरच मंदिर ट्रस्टसोबत पत्रव्यवहार व चर्चा सुरू केली जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. तसेच मंदिर परिसराचे आकर्षक कॉरिडॉरमध्ये रूपांतर करण्याबाबतही नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

या घडामोडीमुळे शुक्लेश्वर मंदिराला आंतरराष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळण्याची शक्यता निर्माण झाली असून, कोपरगावच्या धार्मिक



पर्यटनालाही मोठी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

यावेळी ट्रस्टचे माजी अध्यक्ष बाळासाहेब आव्हाड यांनी डॉ. अवसरमेल, डॉ. महेश चौधरी आणि त्यांच्या संपूर्ण टीमला मंदिराचा इतिहास, धार्मिक महत्त्व तसेच मंदिराच्या वैशिष्ट्यांविषयी सविस्तर माहिती दिली. मंदिर ट्रस्टच्या वतीने आलेल्या संपूर्ण टीमचा यथोचित सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष हेमंत पटवर्धन, मा.अध्यक्ष बाळासाहेब आव्हाड , राजेंद्र आव्हाड, अण्णा आव्हाड, बाळासाहेब लकारे, पंढरीनाथ थोरे, मंदिराचे गुरू नरेंद्र जोशी, राकेश भानगे, मंदिर व्यवस्थापक राजाराम पावरा यांच्यासह शुक्रभक्त उपस्थित होते.

# राज्यस्तरीय ऑलिम्पियाड परीक्षेत नागवडे स्कूलचे उल्लेखनीय यश

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

एक्झलंट ऑलिम्पियाड फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय एक्झलंट ऑलिम्पियाड परीक्षेत श्रीगोंदा येथील तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठान संचलित शिवाजीराव नागवडे डॅफोडील्स स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत इयत्ता पहिलीतील ओवी अमोल नागवडे हिने १९२ गुण मिळवून राज्यात प्रथम क्रमांक पटकावला. इयत्ता दुसरीतील मनस्वी मनोज साखरे व शंभूराज प्रविण जामदार यांनी प्रत्येकी १९८ गुण मिळवून राज्यात प्रथम क्रमांक मिळविला.

याच इयत्तेतील स्वरूप गोरख कोथिंबिरे याने १९४ गुणांसह राज्यात तृतीय क्रमांक, तर ज्ञानेश्वरी राहुल जामदार हिने १९२ गुणांसह राज्यात चतुर्थ क्रमांक मिळविला. इयत्ता तिसरीतील प्रसन्ना सूर्यभान गोलांडे हिने १८८ गुण मिळवून राज्यात तृतीय क्रमांक पटकावला.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे, विश्वस्त अनुराधाताई नागवडे, निरीक्षक एस. पी. गोलांडे, मुख्याध्यापिका नीतू दुलानी तसेच पालक, शिक्षक व शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात भित्तिपत्रकातून स्वातंत्र्यलढ्यातील वीरांगनांना अभिवादन

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या वतीने ९ ऑगस्ट क्रांतिदिन आणि १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर 'भारतातील अग्निशिखा – भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील म हिलांचा सहभाग' या विषयावर भित्तिपत्रक साकारण्यात आले. या भित्तिपत्रकाचे उद्घाटन माजी मंत्री बबनराव पाचपुते यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजी आमदार राहुल जगताप, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य महावीर पटवा तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात महिलांनी दिलेल्या अतुलनीय योगदानाची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी, त्यांच्यामध्ये राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण व्हावी आणि स्वातंत्र्यलढ्यातील वीरांगनांच्या कार्याची ओळख व्हावी, या उद्देशाने हे भित्तिपत्रक तयार करण्यात



आले. राणी लक्ष्मीबाई, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, कॅप्टन लक्ष्मी सहगल, मातंगिनी हाजरा, अरुणा आसफ अली, उषा मेहता आदी शूर महिलांच्या कार्याची माहिती आकर्षक पोस्टर्सच्या माध्यमातून सादर करण्यात आली.

या उपक्रमाचे आयोजन इतिहास विभागप्रमुख प्रा. रमेश थोरात आणि प्रा. डॉ. सुप्रिया पवार यांनी केले. उपक्रमासाठी उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ व उपप्राचार्य डॉ. नितीन थोरात यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच ज्युनिअर विभागाच्या जगताप मॅडम आणि सीनियर विभागाच्या डॉ. अर्चना फुलारी यांनी सहकार्य केले.

# नागरिकांच्या प्रश्नांसाठी आमदार विक्रमदादा पाचपुते यांचा जनता दरबार

### माऊली संपर्क कार्यालयात विविध विभागांचे अधिकारी उपस्थित; नागरिकांच्या समस्यांवर तातडीच्या सूचनांचा वर्षाव

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा शहरातील माऊली संपर्क कार्यालयात प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी म तदारसंघातील नागरिकांच्या विविध अडचणी व प्रश्न सोडविण्यासाठी जनता दरबाराचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमात आमदार श्री. विक्रमदादा बबनराव पाचपुते यांच्यासह तालुक्यातील विविध शासकीय विभागांचे अधिकारी एकाच ठिकाणी उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या जाणून घेतात.

सोमवारी आयोजित करण्यात आलेल्या जनता दरबारास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मतदारसंघातील अनेक नागरिक महसूल, वीज, पाणीपुरवठा, रस्ते, शासकीय योजना तसेच इतर स्थानिक प्रश्नांसंदर्भातील अडचणी घेऊन उपस्थित राहिले.

यावेळी आमदार विक्रमदादा पाचपुते यांनी



नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधत त्यांच्या समस्या समजून घेतल्या. नागरिकांनी मांडलेल्या विविध प्रश्नांची नोंद घेऊन संबंधित अधिकारी व विभागांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी आवश्यक त्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

जनता दरबाराच्या माध्यमातून नागरिकांना आपल्या अडचणी थेट लोकप्रतिनिधींपर्यंत मांडण्याची संधी उपलब्ध होत असून, त्यावर त्वरित पाठपुरावा करण्यास मदत होत आहे. नागरिकांच्या प्रश्नांचे निराकरण प्रशासनाच्या समन्वयातून प्रभावीपणे व्हावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आमदार पाचपुते यांनी स्पष्ट केले.

# बोधेगाव येथील मातंग समाजाच्या स्मशानभूमीवरील अतिक्रमण तातडीने हटवा

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील मातंग सम ाजाच्या स्मशानभूमीवरील कथित अतिक्रमण तातडीने हटवून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी,तसेच स्मशानभूमीला संरक्षण भिंत, सुशोभीकरण व इतर म ूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या निधीतून २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करावा.अशी मागणी भगवान मिसाळ (भाजपा अनुसूचित जाती जमाती जिल्हा उपाध्यक्ष अहिल्यानगर) व प्रमोद अस्मानराव मिसाळ यांनी केली आहे.याबाबत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, बोधेगाव येथील गट क्रमांक १६ मध्ये मातंग समाजाची सार्वजनिक स्म शानभूमी असल्याचे नमूद करण्यात आले आहे.या स्म शानभूमीच्या दक्षिणेस शेवगाव-गेवराई महामार्ग,उत्तरेस बोधेगाव-बालमटाकळी सार्वजनिक रस्ता,पश्चिमेस कृषी उत्पन्न बाजार समिती तर पूर्वेस ग्रामीण रुग्णालय आहे. सन २००९ मध्ये ग्रामपंचायतीमार्फत स्मशानभूमीच्या काही भागाभोवती संरक्षण भिंत बांधण्यात आली होती.

निवेदनानुसार,प्रसाद शिवाजी पवार,नंदू त्रिंबक

**■ केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्याकडे भाजपा अनुसूचित जाती जमाती जिल्हा उपाध्यक्ष भगवान मिसाळ यांचे निवेदनाद्वारे मागणी**

**■ स्मशानभूमीच्या संरक्षण भिंत, सुशोभीकरणासाठी २५ लाखांच्या निधी उपलब्ध करून द्यावा**

ढवळे व संगीता ढवळे यांनी गट क्रमांक १४७ मधील जमीन खरेदी करून त्या ठिकाणी प्लॉटिंगचा व्यवसाय सुरू केला आहे.प्लॉटिंगसाठी मातंग समाजाच्या स्मशानभूमीच्या हद्दीतून मुरूम टाकून अनधिकृत रस्ता तयार करण्यात आल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.

तसेच मूळ सार्वजनिक रस्ता बुजविणे,पोल उभारणे व स्मशानभूमीच्या जागेवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

या प्रकारामुळे मातंग समाजामध्ये भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले.असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

याप्रकरणी शेवगाव तहसीलदारांकडे लेखी तक्रार करण्यात आली.असून मंडल अधिकारी व तलाठ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे.तसेच गटाची मोजणी भूमी अभिलेख कार्यालयाकडे प्रलंबित असल्याचे निवेदनात नमूद आहे.

अहिल्यानगर जिल्हा अत्याचारग्रस्त जिल्हा घोषित करण्याची मागणी दरम्यान,अहिल्यानगर जिल्ह्यात ट्रॉसिटी कायद्यातील पीडितांना प्रभावी संरक्षण मिळावे, जिल्हा अत्याचारग्रस्त जिल्हा म्हणून घोषित करावा.तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा अधिक सक्षम करण्यात यावा. अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

बोधेगाव येथील स्मशानभूमीची तातडीने पाहणी करून भूमी अभिलेख विभागामार्फत मोजणी करावी,मूळ हद्द निश्चित करावी, स्मशानभूमी व सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमण हटवावे.आणि संबंधितांवर लागू कायद्यानुसार कठोर कारवाई करावी.अशी मागणी करण्यात आली आहे.२ऑगस्ट २०२६ रोजी मातंग समाजाच्या स्मशानभूमीच्या संरक्षणासाठी ग्रामपंचायत कार्यालय, बोधेगाव येथे समाजाच्या वतीने लोकशाही मार्गाने आमरण उपोषण करण्यात आले होते.या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री



आठवले यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालून संबंधित प्रशासनाला आवश्यक निर्देश द्यावेत.अशी मागणी भाजपा अनु.जाती जमाती उपाध्यक्ष भगवान मिसाळ व प्रमोद अस्मानराव मिसाळ यांनी व्यक्त केली आहे.सदर निवेदनाची प्रत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनाही देण्यात आली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# सीएपीएफ अधिकाऱ्यांना न्याय देण्यासाठी केंद्राने तातडीने हस्तक्षेप करावा

## सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची खासदार निलेश लंके यांची पंतप्रधानांकडे मागणी

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

केंद्रीय सशस्त्र पोलीस दलातील (सीएपीएफ) अनेक वर्षांपासून देशाच्या सुरक्षेसाठी अत्यंत प्रतिकूल आणि आव्हानात्मक परिस्थितीत सेवा बजावणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काचा न्याय मिळावा, यासाठी केंद्र सरकारने तातडीने हस्तक्षेप करावा. तसेच सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या स्पष्ट निर्देशांची विलंब न करता प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी खासदार नीलेशलंके यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे.

केंद्रीय सशस्त्र पोलीस दलातील अधिकारी देशाच्या सीमा व्यवस्थापनासह अंतर्गत सुरक्षा, दहशतवादविरोधी कारवाया, महत्त्वाच्या शासकीय व राष्ट्रीय संस्थांची सुरक्षा तसेच विविध संवेदनशील भागांमध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम करीत आहेत. अनेकदा प्रतिकूल हवामान, दुर्गम भौगोलिक परिस्थिती आणि जीवितास धोका असतानाही हे अधिकारी व जवान कर्तव्य बजावत असतात. देशाच्या सुरक्षेसाठी आयुष्याची अनेक वर्षे समर्पित करणाऱ्या या अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवेशी संबंधित हक्कांसाठी न्यायालयीन लढा द्यावा लागत असल्याबद्दल खासदार लंके यांनी चिंता व्यक्त केली आहे.

काही प्रकरणांमध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या सेवेशी निगडित न्याय्य मागण्यांसाठी दीर्घकाळ कायदेशीर लढा दिला. या प्रक्रियेनंतर सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या बाजूने महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. न्यायालयाचा निर्णय हा अंतिम असून, त्याचा संबंधित यंत्रणांनी आदर करणे आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी करण्यास कोणताही विलंब होऊ नये, अशी भूमिका खासदार लंके यांनी मांडली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिल्यानंतरही त्याच्या अंमलबजावणीस विलंब होत असल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना अनावश्यक प्रशासकीय आणि कायदेशीर अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे न्यायालयीन आदेशांच्या अंमलबजावणीसाठी संबंधित मंत्रालये व विभागांना स्पष्ट सूचना देण्यात याव्यात. तसेच प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन पात्र अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांचे हक्क, सेवा लाभ आणि न्याय्य सवलती मिळण्यासाठी निश्चित कालमर्यादा आखावी, अशी मागणी लंके यांनी केली आहे.

देशाच्या सुरक्षेची जबाबदारी खांद्यावर घेऊन कार्यरत असलेल्या सीएपीएफच्या अधिकारी व जवानांचे मनोबल उंचावणे ही केंद्र सरकारची महत्त्वाची जबाबदारी आहे. आपल्या सेवाकाळात प्रामाणिकपणे



कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांच्या हक्कांसाठी वर्षानुवर्षे संघर्ष करावा लागणे ही बाब निश्चितच गंभीर आहे. न्यायालयाने त्यांच्या बाजूने निर्णय दिल्यानंतरही त्याची अंमलबजावणी रखडणे ही परिस्थिती बदलणे आवश्यक आहे, असेही खासदार लंके यांनी नमूद केले आहे.

सीएपीएफच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवेशी संबंधित प्रश्नांकडे केवळ प्रशासकीय बाब म्हणून न पाहता मानवी आणि संवेदनशील दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचा सन्मान राखून संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने न्याय मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारने आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करावी.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण अकॅडमीचे उद्घाटन




श्रीगोंदा (समर्थ गांवकरी) : रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील प्रवेश परीक्षा अकॅडमी अंतर्गत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा येथे महाराजा रयत पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. कौटिल्य अकॅडमीचे प्रमुख प्रा. धुमाळ सर यांच्या हस्ते या प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

उद्घाटनप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. धुमाळ सर म्हणाले, आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पोलीस व सैन्य दलामध्ये भरती व्हा आणि आपल्या कुटुंबाचे नाव उज्वल करा. त्यांच्या अकॅडमीमधून अनेक विद्यार्थी पोलीस व सैन्य भरतीत यशस्वी झाल्याची उदाहरणे देत त्यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबर नियमित व्यायाम व शारीरिक सराव करण्याचा सल्ला दिला.

ध्येय निश्चित करून त्या ध्येयाच्या पूर्ततेसाठी सातत्याने व प्रामाणिकपणे प्रयत्न केल्यास कोणतेही ध्येय साध्य करता येते, असा आत्मविश्वास त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केला. पोलीस भरतीसाठी बौद्धिक तयारीइतकीच शारीरिक क्षमता, शिस्त आणि सातत्यपूर्ण सरावही महत्त्वाचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माननीय बाबासाहेब भोस यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना आई-वडील आणि गुरुजनांना केंद्रस्थानी ठेवून सातत्याने सराव करण्याचे आवाहन केले. मेहनत, शिस्त आणि चिकाटीच्या बळावर ध्येय साध्य करता येते, असे त्यांनी सांगितले.

### छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील दोन अध्यापकांना पीएच.डी. पदवी प्रदान

**डॉ. भापकर व डॉ. दांडेकर यांचा समावेश**





श्रीगोंदा (समर्थ गांवकरी) : श्रीगोंदा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील दोन अध्यापकांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली असून, महाविद्यालयाच्या शैक्षणिक क्षेत्रातील ही अभिमानास्पद कामगिरी मानली जात आहे.

महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागातील डॉ. अभिषेक रामदास भापकर यांना दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजी पुणे येथील सिंबायोसिस विद्यापीठाची पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी सिंबायोसिस इन्स्टिट्यूटच्या संशोधन केंद्रातून आपले संशोधनकार्य पूर्ण केले.

डॉ. भापकर यांना सिंबायोसिस इन्स्टिट्यूटचे डॉ. शेखर भामे यांचे मार्गदर्शन लाभले, तर इराण येथील डॉ. खलील घेसारी यांनी सहमार्गदर्शन केले. त्यांच्या संशोधनकार्याचे बहिस्थ पर्यवेक्षण डॉ. भास्कर साठे (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर) यांनी केले. तसेच पुणे विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. श्रीकृष्ण सरताळे आणि सीओईपी, पुणे येथील डॉ. नंदिनी अय्यर यांचेही संशोधनासाठी सहकार्य लाभले. डॉ. भापकर हे गुंडेगाव (ता. नगर) येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक रामदास भापकर यांचे सुपुत्र आहेत.

याचबरोबर महाविद्यालयातील दुसरे अध्यापक डॉ. दांडेकर यांनाही पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. या दोन्ही अध्यापकांच्या यशाबद्दल महाविद्यालय व्यवस्थापन, प्राचार्य, प्राध्यापकवर्ग, विद्यार्थी आणि परिसरातील नागरिकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या संशोधनामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक व संशोधनपर परंपरेत आणखी भर पडली असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

### मराठी दूरचित्रवाणी कार्यक्रमांना समान भाषेतील उपशीर्षक

मुंबई (समर्थ गांवकरी) : मनोरंजन क्षेत्रातील दूरदर्शन, चित्रपट आणि ओटीटी माध्यमांचा लाभ दिव्यांग व्यक्तींनाही सहज घेता यावा, यासाठी दिव्यांग सक्षमीकरण विभागाने पुढाकार घेतला आहे. दूरचित्रवाणीमराठी कार्यक्रमांमध्ये उच्च दर्जाचे समान भाषेतील उपशीर्षक (Same Language Subtitles-SLS) उपलब्ध करून देण्याबाबत विभागाने इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, नवी दिल्ली आणि प्लॅनेट रीड यांच्याशी सामंजस्य करार केला आहे. या उपक्रमामुळे मराठी कार्यक्रमांतील संवाद त्याच भाषेतील स्पष्ट, अचूक, समकालिक आणि वाचनीय उपशीर्षकांसह प्रेक्षकांपर्यंत पोहोचतील. संवादांसोबत आवश्यक ध्वनीविषयक माहितीही उपशीर्षकांमधून मिळणार असल्याने श्रवणदिव्यांग व्यक्तींसाठी कार्यक्रम अधिक सुलभ होतील.

# पारनेरच्या केंद्राच्या सेवाधाऱ्यांची मधुबन येथे समर्पित सेवा

पारनेर (समर्थ गांवकरी)



पारनेर येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय केंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी साधना दीदी यांच्या मार्गदर्शनाखाली, पारनेर केंद्राच्या हिराबाई मगर, गजराबाई औटी, संगीता शेळके, संगीता खोडदे, सुशीला माता, लीलावती काळे या सेवाधाऱ्यांचा एक विशेष गट राजस्थानमधील माऊंट आबू येथील जागतिक मुख्यालयात समर्पित सेवेसाठी दाखल झाला आहे.

अरावली पर्वतरांगांच्या कुशीत वसलेल्या या आध्यात्मिक नगरीत सेवा करण्याची संधी मिळाल्याने या साधकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

माऊंट आबू येथील ब्रह्माकुमारीजचे मुख्य केंद्र 'मधुबन' हे केवळ एक ठिकाण नसून, ते धरतीवरचे स्वर्ग असल्याचे मानले जाते. या पावन भूमीला स्पर्श करणे म्हणजेच अनेक जन्मांची कर्मे आणि पापांचे क्षालन होणे होय, अशी गाढ श्रद्धा येथे येणाऱ्या साधकांची आहे. अनेक महान तपस्व्यांच्या तपस्येने पावन झालेल्या या आबू पहाडीवर सध्या पारनेरचे सेवाधारी आत्मिक आणि आध्यात्मिक ऊर्जेचे संवर्धन करत आहेत.

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय आज जगातील १४० हून अधिक देशांमध्ये शांततेचा संदेश पसरवत आहे. हे विद्यालय मानवाला देवतुल्य बनवण्याची प्रेरणा आणि आंतरिक शक्ती प्रदान करण्याचे कार्य अविरत करत आहे. मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी येथे ग्रामविकास उपक्रम, तणावमुक्त जीवनशैली, शिक्षण, वैद्यकीय सेवा, व्यसनमुक्त समाज अभियान आणि योगिक शेती यांसारखे महत्त्वपूर्ण प्रकल्प राबवले जातात.

सध्याच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येक व्यक्ती सुख आणि शांततेच्या शोधात आहे. यावर उपाय म्हणून विद्यालयात 'राजयोगाचा' अभ्यास करून घेतला जातो. मानवी मनात येणारे नकारात्मक विचार आत्म्याची शक्ती क्षीण करतात, परंतु नियमित राजयोग अभ्यासामुळे आत्म्याच्या सात मूळ शक्ती-सुख, शांतता, आनंद, प्रेम, पवित्रता, ज्ञान आणि शक्ती-पुन्हा जागृत होतात.

या अभ्यास दौऱ्यात सहभागी झालेल्या सेवाधाऱ्यांनी आपला अनुभव व्यक्त करताना सांगितले की, अरावलीच्या या शांत आणि निसर्गरम्य वातावरणात आल्यावर सर्वजण जणू देहभान विसरून जातात. येथे मिळणारा अलौकिक अनुभव केवळ स्वतःलाच नव्हे, तर समाजात दुःखी आणि अशांत असलेल्या लोकांनाही जगण्याची नवी प्रेरणा देणारा आहे.

या समर्पित सेवेमुळे पारनेरच्या साधकांसाठी मानवी जीवनाचा एक नवा आणि सुखकर मार्ग खुला झाला आहे, असे या प्रवासातून अधोरेखित होत आहे.

# पारनेर शहराच्या विकास आराखड्याचे (DPR) नोटिफिकेशन येत्या आठवड्यात प्रसिद्ध होणार

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश**

पारनेर (समर्थ गांवकरी)



दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या पारनेर शहराच्या विकास आराखड्याचा (DPR) मार्ग अखेर मोकळा झाला आहे. येत्या आठवड्यात या विकास आराखड्याचे अंतिम नोटिफिकेशन प्रसिद्ध करण्याचे स्पष्ट निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नगरविकास विभागाला दिले आहेत.

काही महिन्यांपूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पारनेर शहराच्या विकास आराखड्याला मंजुरी दिली होती. मात्र, तांत्रिक कारणांमुळे अंतिम नोटिफिकेशन प्रसिद्ध होणे बाकी होते. या पार्श्वभूमीवर आज सुजित झावरे पाटील आणि अनिलराव शिंदे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पारनेर नगरपंचायतीच्या ज्झठ चे प्रलंबित नोटिफिकेशन लवकरात लवकर प्रसिद्ध करण्याची आग्रही मागणी केली.

**नगरविकास विभागाची तातडीची बैठक**

या मागणीची दखल घेत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी तात्काळ नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता यांच्यासोबत बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी पारनेर शहराच्या विकासाची गरज लक्षात घेता नगरविकास विभागाने येत्या आठवड्यात हे नोटिफिकेशन प्रसिद्ध करावे, असे स्पष्ट निर्देश दिले.

**पारनेर शहराच्या विकासाला मिळणार वेग**

उपमुख्यमंत्र्यांच्या या निर्णयामुळे पारनेर शहराच्या रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि पायाभूत सुविधांच्या विकासाचा मार्ग सुकर झाला आहे. नोटिफिकेशन प्रसिद्ध झाल्यानंतर प्रत्यक्ष विकासकामांना गती मिळणार असल्याने पारनेरकरांमधून आनंद व्यक्त केला जात आहे.

# जामखेड येथे नागपंचमी यात्रेनिमित्त श्रीनागेश्वर मंदिर येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताहास आयोजन

- श्रावण महिन्यात संपूर्ण महिन्याभर पिंडीवरील पितळी कवच
- हटविण्याचा मंदिर समितीचा निर्णय : विनायक राऊत

जामखेड (समर्थ गांवकरी)

जामखेड येथील ग्रामदैवत श्री नागेश्वर मंदिराचा प्रतिवर्षीप्रमाणे भव्य सप्ताह होत असून या सप्ताहाचा प्रारंभ दिनांक १२ ऑगस्ट रोजी होत आहे. सप्ताह दरम्यान दररोज पहाटे काकडा, श्री शिवलीलामृत पारायण, गाथा भजन, किर्तन, हरिपाठ संत ज्ञानेश्वर माऊली संगीतमय चरित्र कथा असे विविध कार्यक्रम होणार आहेत तसेच भाविक भक्तांच्या मागणीनुसार श्रावण महिन्यात संपुर्ण महिन्याभर पिंडीवरील पितळी कवच हटविण्याचा निर्णय मंदिर समितीचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती मंदिर समितीच्या वतीने विनायक राऊत यांनी दिली आहे. ग्रामदैवत श्री नागेश्वराच्या पालखीचे हे २३ वे तर सप्ताहाचे हे १७ वे वर्ष आहे. या सप्ताची सुरुवात दि. १२ ऑगष्ट रोजी होत असून यावर्षी अखंड हरिनाम सप्ताहात संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५१ व्या जन्मोत्सवी वर्षाचे औचित्य साधून संत ज्ञानेश्वर माऊली संगीतमय चरित्र कथेचेही आयोजन करण्यात आले आहे. सकल संत चरित्र व श्री राम कथा प्रवक्ते ह.भ.प श्री. दीपकजी महाराज श्रीक्षेत्र तेर (गोरोबा काकांचे) यांच्या मधुर वाणीतून हे भक्तांना श्रवण करण्यास मिळणार आहे.




संपूर्ण उत्सावा दरम्यानचे दैनंदिन कार्यक्रम.. पहाटे काकडा, श्री शिवलीलामृत पारायण, गाथा भजन, दुपारी ३ : ०० ते ४ : ३०किर्तन, हरिपाठ, दररोज सायंकाळी ६ : ०० ते ९ : ०० वा संत ज्ञानेश्वर माऊली संगीतमय चरित्र कथा नंतर भोजन तर सोमवार दि. १७ रोजी श्रीनागेश्वर पालखी सोहळा व दि. १९ ऑगस्ट रोजी ह. भ. प. चेतन जी महाराज बोरसे (मालेगाव) यांचे काल्याचे कीर्तन व महाप्रसादाने या संपूर्ण उत्सवाची सांगता होईल होणार असून या सर्व कार्यक्रमांचा लाभ भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# ३७.९३ लाखाच्या रस्त्यांच्या कामांच्या निविदा प्रसिद्ध : आ. आशुतोष काळे

कोपरगांव (समर्थ गांवकरी)



कोपरगाव मतदारसंघाचा सर्वांगीण विकास साधून नागरिकांना दर्जेदार मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महायुती शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. या पाठपुराव्यातून मतदारसंघात शेकडो विकासकामे पूर्ण झाली असून अनेक कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित विकासकामांना गती देण्यासाठी सुरु असलेल्या प्रयत्नातून मतदारसंघातील ३७ लाख ९३ हजार रुपयांच्या रस्ते विकासकामांच्या निविदा प्रसिद्ध झाल्या असल्याची माहिती आ. आशुतोष काळे यांनी दिली.

प्रसिद्ध झालेल्या निविदांमध्ये कोळपेवाडी येथील डॉ. जुंधारे परिसरातील रस्ता काँक्रीटीकरणासाठी १५ लाख ६७ हजार रुपये, कान्हेगाव येथील गोरख विंचू ते दत्तात्रय सांगळे वस्ती रस्ता खडीकरणासाठी १० लाख ३७ हजार रुपये, तसेच चासनळी येथील बारगळ वस्ती रस्ता डांबरीकरणासाठी ११ लाख ८९ हजार रुपये अशा एकूण ३७ लाख ९३ हजार रुपयांच्या कामांचा समावेश आहे.कोपरगाव मतदारसंघातील ग्रामीण भागातील रस्त्यांची स्थिती सुधारण्यासाठी आ.आशुतोष काळे यांचे सातत्याने प्रयत्न सुरु आहेत. त्यांच्या पाठपुराव्यामुळे अनेक रस्त्यांची कामे मार्गी लागली असून आगामी काळातही आवश्यक असलेल्या रस्ते विकासकामांना प्राधान्य दिले जाणार आहे.

या रस्ते विकासकामांमुळे संबंधित गावांतील नागरिकांची दळणवळणाची अडचण दूर होण्यास मदत होणार आहे. तसेच विद्यार्थी, शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांना ये-जा करणे सुलभ होणार असून शेतकऱ्यांना आपला शेतमाल बाजारपेठेत नेण्यासाठीही मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे. कोळपेवाडी, कान्हेगाव आणि चासनळी येथील नागरिकांनी या विकासकामांसाठी आ. आशुतोष काळे यांचे

# शरद पवार गट...राष्ट्रवादी काँग्रेसच्या आदिवासी सेलच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड

**नगर जिल्ह्यातील पुरोगामी विचारांचा चेहरा पोपट चौधरी ....**

अकोले : अकोले तालुक्यातील आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठविणारे तसेच सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय असलेले श्री. पोपटराव चौधरी यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार यांच्या आदिवासी सेलच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्याची पक्षाने दखल घेत ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

अकोले तालुक्यासह परिसरातील आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर सातत्याने भूमिका मांडणारे पोपट चौधरी यांनी विविध सामाजिक उपक्रम, मोर्चे, आंदोलने तसेच जनहिताच्या प्रश्नांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, विकासाच्या प्रश्नांसाठी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या विविध समस्यांसाठी त्यांनी वेळोवेळी आवाज उठविला आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर प्रदेश पातळीवरील महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्याचे युवक अध्यक्ष आदिवासी नेते श्री अमित अशोकराव भांगरे यांनी देखील या निवडीबद्दल अभिनंदन केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार यांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विविध भागांतील आदिवासी समाजाच्या समस्या जाणून घेणे, त्या शासन दरबारी मांडणे तसेच त्यावर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी संघटनात्मक पातळीवर काम करण्याची जबाबदारी आता पोपट चौधरी यांच्यावर राहणार आहे. त्यामुळे अकोले तालुक्यातील कार्यकर्त्यांसह आदिवासी समाजामध्ये या निवडीबद्दल उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विविध मोर्चे, आंदोलने आणि जनहिताच्या प्रश्नांवर पोपट चौधरी यांनी वेळोवेळी घेतलेल्या ठाम भूमिकेची पक्षाने दखल घेतली आहे. प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारी मिळाल्यामुळे अकोले तालुक्यासह महाराष्ट्रातील आदिवासी समाजाचा आवाज अधिक बुलंद होईल, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अकोले तालुकाध्यक्ष सुरेश गडाख यांनी व्यक्त केला.

पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने सोपविलेल्या या जबाबदारीबद्दल पोपट चौधरी यांनी पक्षाचे आभार व्यक्त केले असून, आदिवासी समाजाच्या मूलभूत प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यभर संघटनात्मक पातळीवर प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

या नियुक्तीप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा माजी मंत्री शशिकांतजी शिंदे, आदिवासी महामंडळाचे संचालक व पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष मा. आमदार सुनील भुसारा, दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भगरे गुरुजी, आदिवासी सेलचे प्रदेशाध्यक्ष जयवंत



वानोळे, अकोले तालुकाध्यक्ष सुरेश गडाख, , विनोद हांडे, सुरेश खांडगे, सुनील लोखंडे, उमेश देशमुख, उमेश डावरे, भाऊपाटील तळेकर यांच्यासह असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नाशिक जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

पोपट चौधरी यांच्या नियुक्तीबद्दल अकोले तालुक्यासह विविध भागांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, नव्या जबाबदारीच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या प्रश्नांना राज्यस्तरावर अधिक व्यापक व्यासपीठ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.